CMYK

**अवैध धंद्याला पोलिस प्रशासनाचा आशीर्वाद..?** >>पान 2

**जिद्द अन् चिकाटीच्या बळावर संदीपची यशाला गवसनी** >>पान 3

**सरपंच शिवचरण आरवाडे यांनी काढले महावितरणला फर्मान** >>पान 4

**सुविचार**

फक्त मदत मागा
सगळे लायकी दाखवतील.

# दैनिक आपला विदर्भ

**युवराजसोबत डेट गेलेली ती अभिनेत्री कोण?**

आतील पान



apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 53 ■ रविवार, दि. 29 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# निवडणूक काळात एटीएम व्हॅनला निर्बंध, तक्रारीसाठी ॲप

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्या २ दिवसांत राज्यातील राजकीय पक्ष व विविध संस्थांशी चर्चा करुन विधानसभा निवडणुकांसाठीचा आढावा घेतला आहे. त्यानंतर, आज पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांसाठीची महत्वाची माहिती दिली. राज्यातील मतदारांची संख्या, पुरुष, महिला, तृतीयपंथी मतदार आणि मतदारांमध्ये झालेल्या वाढीसंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार यांनी माहिती दिली. तसेच, निवडणूक काळात काही निर्बंध घालण्यात येणार असून एटीएमसाठी पैशांचा पुरवठा करणाऱ्या व्हॅनला वेळेचे बंधन असणार आहे. तसेच, याकाळात अँब्युलन्स, बँक आणि पतसंस्था यावर देखील लक्ष ठेवलं जाईल, असेही राजीव कुमार यांनी म्हटलं.

## आयोगाने दिली महत्त्वाची माहिती

राज्यात एकूण २८८ विधानसभा मतदारसंघांत निवडणूक होत आहे. त्यासाठी, राज्यात पुरुष मतदार ४. ९५ कोटी आणि स्त्री मतदार ४.६४ कोटी आहेत, थर्ड जेंडर म्हणजेच तृतीयपंथी मतदारांची संख्या ५९९७ असून राज्यातील दिव्यांग मतदार ६.३२ लाख एवढे आहेत. यंदा पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या नवयुवकांची संख्या म्हणजे नव मतदार १९.४८ लाख एवढे आहेत. राज्यांत महिला मतदारांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून १०.७७ लाख मतदार आहेत. शहरातील मतदान बुथ केंद्रांची संख्या ४२ हजार ५८५, तर ग्रामीण महाराष्ट्रात ५७ हजार ६०१ मतदान बुथ केंद्र असणार आहेत. काही ठिकाणीं तरूण अधिकारी बूथ मॅनेज करतील. ३५० असे बूथ असतील जिथे तरुण अधिकारी बूथ मॅनेज करतील. लोकसभा निवडणुकीत कमी मतदान क्षेत्र असेलल्या कुलाबा, कल्याण, कुर्ला, मुंबादेवी इथ




मतदान कमी झालं आहे. गडचिरोली येथे ७३ टक्के मतदान झालं, मग कुलाबा कल्याण येथे मतदानाचा टक्का वाढायला हवा. इथल्या मतदारांनी विचार करायला हवा,असेही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

निवडणूक आयोगाच्यावतीने सुविधा पोर्टल नावाने ॲप जारी करण्यात आलं आहे. या एप्लिकेशन्सवर मतदारांना तक्रार करता येणार आहे. एखाद्या ठिकाणीं काही घटना घडली किंवा उशीरापर्यंत मतदान सुरु असेल तर केवळ फोटो काढून या एप्लिकेशन्सवर अपलोड केला की, ९० मिनिटांत निवडणुक आयोगाची टीम तिथं पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. एटीएमसाठी पैसै घेऊन जाणाऱ्या गाडीला निवडणुक काळात रात्री ६ ते सकाळीं ८ पर्यंत पैसे वाहतूक करता येणारं नाही. याकाळात अँब्युलन्स, बँक आणि पतसंस्थांवर देखील लक्ष ठेवलं जाईल.

## शरद पवार आणि उद्धव ठाकरेच पक्षफुटीला जबाबदार! : फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई : राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे दोन्ही पक्ष सत्तेच्या लढाईमुळे फुटले आहेत. शरद पवारांना आपल्या मुलीला आणि उद्धव ठाकरे यांना मुलाला पक्षाचा वारसा द्यायचा या महत्वाकांक्षेने त्यांचा घात केला, असे भाजपा नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



राज्याच्या राजकारणात तीन वर्षापूर्वी शिवसेनेत बंड झालं. त्यानंतरच्या दीड वर्षात राष्ट्रवादी काँग्रेसही फुटली. या पक्षातील दोन्ही गट सत्तेत सहभागी झाले. हे दोन्ही पक्ष भाजपानेच फोडले असा आरोप विरोधी पक्षांकडून आजही केला जातो. या आरोपांना आणि दोन्ही पक्ष फुटण्याला नेमकं कोण जबाबदार आहे या प्रश्नाचे उत्तर फडणवीस यांनी दिले. भाजपामुळे राज्यात सहा पक्ष तयार झाले आहेत का? असा प्रश्न त्यांना एका मुलाखतीत विचारण्यात आला होता. या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट शब्दांत हे उत्तर दिले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, एक काळ असा होता की त्यावेळी काँग्रेसचे लोक म्हणायचे की या सगळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात होता. अजूनही काही प्रमाणात असे बोलले जात आहेच. पण ते खरे नाही. ज्यांनी आयुष्यभर लोकांचे पक्ष फोडले त्यांचा पक्ष भाजपा कसा काय फोडू शकतो? असा प्रतिसवाल फडणवीस यांनी केला.

खरं तर शरद पवारांचा पक्ष त्यांनीच फोडला. इतकी वर्ष त्यांनी त्यांचा वारसा अजित पवारांकडे दिला होता. नंतर त्यांना वाटलं की आता हा वारसा मुलीला दिला पाहिजे. राजकारणातील घराणेशाहीच्या पक्षांची अवस्था अशीच होत असते. यानंतर अजित पवार यांना वाटलं की आता आपलं राजकारणच संपेल त्यावेळी ते आमच्यासोबत आले, असे फडणवीस म्हणाले.

# महापुरुषांची स्मारके प्रेरणादायी आणि दिशादर्शक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### नाशिक येथे महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे अनावरण

**दैनिक आपला विदर्भ**

नाशिक/प्रतिनिधी : महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सामाजिक समतेचे प्रतिक आहेत. त्यांनी शेतकरी, कामगार, महिला आणि कष्टकऱ्यांसाठी आपले सर्वस्व अर्पण केले. त्यांचे कार्य महाराष्ट्राबरोबरच जगासाठी वंदनीय आहे. महापुरुषांची स्मारके प्रेरणादायी, ऊर्जा देणारी आणि दिशादर्शक असतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मंत्री श्री. भुजबळ यांच्या संकल्पनेतून नाशिक महानगरपालिकेतर्फे मुंबई नाका येथे साकारण्यात आलेल्या क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचा लोकार्पण सोहळा आज दुपारी संपन्न झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री दादाजी भुसे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, फुले दाम्पत्याचे काम उत्तुंग आहे. त्यांच्या आदर्शांवर वाटचाल करणे हे आपले कर्तव्य आहे. महापुरुषांनी सामाजिक समतेचा पाया घातला. महाराष्ट्र हे पुरोगामी आणि प्रगतीशील राज्य आहे. त्यामागे महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा जोतिराव फुले यांना आपले गुरू मानले होते. महात्मा जोतिराव फुले यांनी ब्रिटीश साम्राज्याला आव्हान देत शेतकरी, कामगार आणि शोषितांचे प्रश्न्न मांडत तत्कालीन व्यवस्थेवर आसूड ओढले. पुण्यातील मुलींची पहिली शाळा असलेल्या भिडे वाड्याचे स्मारकात रुपांतर करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

राज्यात औद्योगिक, पायाभूत सुविधा मजबूत होत आहेत. राज्यआर्थिक दृष्ट्या सक्षम बनत असल्याने सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात चांगले काम करता येणार आहे. शिक्षण, आरोग्य, कृषी, सिंचन, रोजगार-स्वयंरोजगार, उद्योग, कौशल्य विकासात आपण सर्व घटकांचा विचार करीत आहोत. क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी मुलींसाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला. आता महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेचा, संविधानाचा मार्ग दाखविला आहे. त्याच मार्गावरून आपल्याला वाटचाल करायची आहे. महात्मा फुले यांनी प्रवाहाच्या विरोधात जाऊन समाज सुधारणांसाठी लढा दिला. ते युग पुरुष होते. त्यांनी समाजाला दिशा देण्याचे काम केले. त्यांनी समाजाला शिक्षणाचा मंत्र दिला. त्यामुळे परिवर्तन घडून आले. सामाजिक कार्यात त्यांचे नाव अग्रेसर राहील, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक समतेचा लढा देत स्त्री शिक्षणाचा पाया रचला. त्यांनी दिलेल्या सत्यशोधक विचारांवर देश उभा आहे. त्यांच्या विचारांचा वारसा आपल्याला पुढे घेऊन जायचा आहे. मुलींची देशातील पहिली शाळा असलेल्या भिडे वाडा येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तेथे मुलींची शाळा सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. फुले दांपत्याला भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.



महात्मा जोतिराव फुले यांच्या मूळ गावी आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा सुरू करण्यात येईल, असे सांगत त्यांनी नाशिकमध्ये उभारण्यात आलेले स्मारक वैभवात भर घालणारे आहे, असे ही सांगितले.

मंत्री श्री. भुजबळ म्हणाले की, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांनी आयुष्यात विविध संकटांवर मात करुन आपले कार्य सुरू ठेवले. त्यांनी विविध क्षेत्रात कामगिरी बजावून सामाजिक प्रश्न्न हाताळले. प्लेगच्या साथीत त्यांनी रुग्णांची सेवा केली. त्यांनी सर्वच पंथांचा विचार केला आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे अर्ध पुतळे हे देशातील सर्वांत मोठे अर्ध पुतळे आहेत. त्यांनी केलेले काम कायम संस्मरणीय आहे. सर्वांना शिक्षण, शेतकऱ्यांना मदत आणि महिलांचे सबलीकरण हे सावित्रीबाई फुले यांचे स्वप्न साकारण्याचे काम राज्य शासन करीत आहे, असेही मंत्री श्री. भुजबळ यांनी सांगितले.

# शरद पवारांच्या हस्ते आज सर्व खासदारांचा सत्कार

### महायुतीचे खासदार हजेरी लावणार? राज्याचं लक्ष

**दैनिक आपला विदर्भ**

सोलापूर/प्रतिनिधी : देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतनाचा सोहळा अकलूज येथे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमास राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजयसिंह मोहिते पाटील, शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात शरद पवारांच्या हस्ते राज्यातील सर्व खासदारांच्या सत्काराचे नियोजन करण्यात आले आहे. महायुतीचे कुठले खासदार या सोहळ्याला हजेरी लावणार? याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.



राज्यात निवडून आलेल्या सर्व ४८ खासदारांना सत्कारासाठी निमंत्रित केले आहे. मंत्री वगळता सर्व पक्षाचे नूतन खासदार येतील, असा विश्र्वास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केला आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभेत महाविकास आघाडीने महायुतीला जोरदार दणका दिल्याने या कार्यक्रमाला आता महायुतीचे कोणते खासदार हजर राहणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. याचे कारणही तसेच असून काही दिवसांपूर्वी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केंद्रात लवकरच बदल घडेल, असे भाकीत वर्तवले होते. आता मोहिते पाटील यांनी राज्यातील सर्व खासदारांना सत्कारासाठी निमंत्रण दिल्याने महायुतीचे खासदार काय भूमिका घेणार? हे उद्या स्पष्ट होणार आहे.

अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे हा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला असून येथे मोहिते पाटील यांचे शक्ती प्रदर्शन पाहायला मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत जे नवीन समीकरण बनले त्याचा चमत्कार महाराष्ट्राने बघितला, असे सांगताना उद्याच्या कार्यक्रमानंतर काय होईल हे महाराष्ट्र पाहील, असेही संकेत त्यांनी यावेळी दिले आहे.

सोलापूर जिल्ह्यात नुसतं माढा आणि पंढरपूर नसून सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात इच्छुक उमेदवारांची महाविकास आघाडीतून निवडणूक लढवण्याची तयारी आहे. याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विजयसिंह मोहिते पाटील व उद्धव ठाकरे यांच्याकडे असतील असेही त्यांनी यावेळी सांगितले. १ ऑक्टोबरनंतर महाविकास आघाडीच्या जागा वाटपासंदर्भात बैठकीला सुरुवात होणार आहे. यानंतर कोणती जागा कोणाला मिळेल हे निश्र्चित होईल, असे धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले आहे.

# मोठी बातमी! मुंबईत नवरात्रौत्सवात दहशतवाद्यांचे सावट

### मुंबईकरांसाठी पोलीस ढाल बनून सज्ज

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : नवरात्रौत्सवाच्या पार्श्र्वभूमीवरमुंबईत पोलिस ढाल बनून मुंबईकरांच्या संरक्षणासाठी तत्पर आहेत. नवरात्रौत्सवात दहशतवाद्यांचे सावट असूनगर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा फौजफाटा तैनात असणार आहे. हे लक्षात घेता गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची करडी नजर असणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आगामी नवरात्रौत्सव हा सण पाहता धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. यामुळे कानाकोपऱ्यात सुरक्षा तैनात करण्यात आली. रेल्वे स्थानक, मॉल्स, धार्मिक स्थळे या गर्दीच्या ठिकाणीनवरात्रौत्सवानिमित्त वादंग निर्माण होण्याची शंका नाकारता येत नाही. यासाठी गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त दक्षता घेण्यात येणार आहे. सणानिमित्ताने देवी मूर्तीसाठी नऊ दिवस मंडप बांधण्यात येणार आहेत. त्यावेळी हल्ले होणार असल्याची शक्यता असल्याने सतर्कता म्हणून पोलीस दल तैनात करण्यात आले.

यावेळी कोणताही विलंब न करता नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधून माहिती द्यावी. सणाला गालबोट लागावे या उद्देशाने तेढ निर्माण करण्यासाठी काही समाजकंटक देशात फिरत आहेत. यामुळे खोली मालक, हॉटेल मालक, पर्यटक यांना याप्रकरणी सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पासपोर्ट, व्हिसा काळजीपूर्वक तपासा, यावेळी मुंबई पोलिसांनी नागरिकांना सणावेळी तांत्रिक उपकरणे न वापरण्याचे आदेश दिले आहेत.

# हर्षवर्धन पाटलांचे ठरल! महायुती की महाविकास आघाडी? पितृपंधरवडा संपताच करणार घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवार आपल्या पक्षाला सोडून दुसऱ्या पक्षात जाणार हे काही नवीन नाही. अशातच गेल्या काही दिवसांपासून इंदापूरमध्ये ज्येष्ठ भाजप नेते माजी मंत्री हर्षवर्धन पाटील भाजपला सोडचिठ्ठी देऊन लवकरच तुतारी फुंकणार असी चर्चा रंगली होती. या चर्चेवर अखेर हर्षवर्धन पाटील यांनी मौन सोडले आहे. त्यांचे ठरले असून पितृपंधरवडा संपताच ते मोठी घोषणा करणार असल्याचे म्हणाले.

हर्षवर्धन पाटलांचे ठरले. मात्र ते पितृपंधरवडा संपल्यानंतर निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितलेय. इतकंच नाही तर दहा वर्षात सविंधानिक पद नाही तरीही आपण जनतेच्या आग्रहाखातर कॉंगेस, भाजपात जाण्याचा निर्णय घेतला, आणि आताही जे काही जनतेच्या मनात असेल तोच निर्णय घेऊ असेही ते म्हणाले. इंदापुरातील सभेदरम्यान कार्यकर्त्यांनी तुतारी हाती घेण्याची घोषणाबाजी केली. यावर कार्यकर्त्यांताआग्रह डावलता येणार नाही असं म्हणत त्यांनी तुतारी हाती घेणार असल्याचे संकेत दिले.

हर्षवर्धन पाटील यांनी आज सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून आमचा मतदारसंघांमध्ये जनता दरबार सुरू होता. आज शेवटचा जनता दरबार असून लोकांच्या अडचणी, शेतकऱ्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्यात. लोकांचा आग्रह आहे की मी इंदापूरमधून निवडणूक लढवली पाहिजे आणि लोकशाहीमध्ये जनता श्रेष्ठ असल्याने त्यांच्या मताचा विचार करावा, असा आग्रह असल्याचे ते म्हणालेत.



२०१४ मध्ये राष्ट्रवादी आणि काँग्रेस स्वतंत्र लढले आणि तेव्हा राष्ट्रवादीच्या दत्तात्रेय भरणे यांनी पाटलांचा पराभव केला. पुढे २०१९ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीने एकत्र लढण्याचा निर्णय घेतला. इंदापूरची जागा राष्ट्रवादीला सुटली, त्यामुळे पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश करत निवडणूक लढवली तरही त्यांच्या पदरी निराशा आली.

CMYK

## श्रीलंकेत सत्तांतर ; भारताची डोकेदुखी वाढली

भारताचा शेजारी देश असलेल्या श्रीलंकेत नुकतेच सत्तांतर झाले असून तिथे डाव्या विचासरणीचे अनुरा कुमार दिसनायके हे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. श्रीलंकेत नुकतीच निवडणूक झाली आणि त्या निवडणुकीत विमुक्त पेरामुना या राजकीय पक्षाला बहुमत मिळाले. श्रीलंकेत याआधी कधीही या पक्षाला बहुमत मिळाले नव्हते यावेळीही या पक्षाला बहुमत मिळेल असे कोणाला वाटले नव्हते कारण विद्यमान राष्ट्राध्यक्ष रानील विक्रमसिंघे आणि माजी राष्ट्राध्यक्ष राजपक्षे गोटाबाया यांच्या पक्षात मुख्य लढत होती आणि या दोन पक्षापैकीच एका पक्षाचा विजय होईल असा कयास व्यक्त केला जात होता मात्र हा कयास फोल ठरवत दीसनायके यांनी करिश्मा करत आपली सत्ता आणली. श्रीलंकेसाठी हे सत्तांतर महत्वाचे ठरणार आहे कारण गेल्या दोन वर्षात श्रीलंकेत अनेक घडामोडी घडल्या. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२२ मध्ये श्रीलंकेत जनतेनेच उठाव करून तेंव्हाचे श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष राजपक्षे गोटाबाया यांना देशातून हाकलून लावले होते. राजपक्षे गोटाबाया यांच्या नंतर त्यांची जागा विरोधी पक्षाचे नेते रानिल विक्रमसिंघे यांनी घेतली. या दोघांनी नेहमीच आलटून पालटून श्रीलंकेची सत्ता उपभोगली पण या दोन्ही नेत्यांविषयी जनतेच्या मनात नाराजी होती कदाचित हीच नाराजी श्रीलंकन जनतेने मतपेटीतून व्यक्त करून तिसरा पर्याय निवडला. श्रीलंकन जनतेने निवडलेला हा तिसरा पर्याय भारतासाठी मात्र डोकेदुखी ठरू शकतो कारण दिसनायके यांचा विमुक्त पेरामुना हा पक्ष डावी विचारसरणी मानणारा पक्ष आहे आणि या पक्षाचे चीनशी सौहार्दाचे संबंध आहेत. खुद्द दिसनायके हे चीन समर्थक मानले जातात. त्यांनी अनेकदा चीनची उघडपणे बाजू घेतली आहे आणि भारतासाठी हीच चिंतेची बाब आहे. पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ ही भारताची शेजारी राष्ट्रे ही या आधीच पाकिस्तानच्या आधीन गेली आहेत त्यात आता श्रीलंकेची भर पडणार आहे. श्रीलंकेची जर चीनशी सलगी वाढली तर हिंद महासागरात भारताच्या वर्चस्वाला धोका पोहचू शकतो. भारत विरोधी कारवाया करण्यासाठी चीन श्रीलंकेचा वापर करू शकतो त्यामुळे भारताने श्रीलंकेबाबत आता अधिक सजग राहावे लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे दिसनायके यांनी श्रीलंकेतील तमिळ चळवळीला कायम विरोध केला आहे. भारत श्रीलंकेतील तमिळ चळवळीला प्रोत्साहन देत असून तमिळ नागरिकांच्या स्वतंत्र राष्ट्राच्या मागणी मागे भारताचा आरोप असल्याचा आरोप त्यांनी याआधी केलेला आहे. एकंदरीत श्रीलंकेतील सत्तांतर भारतासाठी डोकेदुखी ठरणारे आहे. अर्थात सत्तेवर येताच दिसनायके यांनी भारताशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचे वक्तव्य केले ही समाधानाची बाब आहे. २०२२ मध्ये श्रीलंकेत जेंव्हा उठाव झाला तेंव्हा भारतानेच त्यांना आर्थिक मदत केल्याचे त्यांनी सांगितले असून त्यांनी त्यासाठी भारताचे आभारही मानले आहे हे जरी खरे असले तरी चीन त्यांना कधी आपल्या फाशात अडकावेल हे सांगता येत नाही.

# अवैध धंद्याला पोलिस प्रशासनाचा आशीर्वाद..?

## आदर्श व स्मार्ट गाव असलेल्या पांगरखेड येथील प्रकार
## ग्रामपंचायतीने ठराव घेत दिले ठाणेदाराला निवेदन

**डोणगाव/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील आदर्श व स्मार्ट गाव म्हणून ओळख असलेल्या पांगरखेड इथेच आता मात्र अवैध धंद्यांचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे. मात्र पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने अवैध धंद्यांना सुगीचे दिवस आले आहेत. परिणामी सर्वसामान्य नागरिकांचे जीवन जगणे कठीण केले आहे.

अवैध धंद्यामुळे गावातील सामाजिक सलोखा बिघडत असून गावात तंटे वाढले आहेत. गावातील तरुण या अवैध धंद्यांमुळे व्यसनाधीन होत आहेत. तरी याकडे आपण जातीने लक्ष देऊन गावातील अवैध धंदे तात्काळ बंद करावे,अशी मागणी आदर्श



गाव पांगरखेड ग्रामपंचायतीने ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन केली. याकडे दुर्लक्ष न करता तात्काळ कारवाई करण्यात यावी इशाराही ग्रामपंचायतीच्यावतीने मागणी करण्यात आली आहे. डोणगाव पोलिस स्टेशनला दि. २६ सप्टेंबर रोजी निवेदनाद्वारे दिला आहे.

डोणगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, पांगरखेड हे बुलढाणा जिल्ह्यातील आदर्श गाव असून स्मार्ट गाव म्हणून या गावाची सर्वत्र नावलौकीक आहे. मात्र पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने गावात अवैध धंद्यांनी कळस गाठला असून चौकाचौकात अवैध धंदे खुलेआम व पोलिस प्रशासनाच्या नाकावर टिचून हे धंदे केले जात आहेत.

अवैध धंदे करणारे हे पोलिस प्रशासनाला न जुमानता मनमानी करत खुलेआम अवैध धंदे करत आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील आदर्श व स्मार्ट गाव असलेल्या पांगरखेड येथे वेळोवेळी प्रशासकीय अधिकारी व विविध पक्षाचे पदाधिकारी भेट देऊन गावाच्या विकासाबाबत कौतुक करीत आले आहेत.

मात्र गत काही काळापासून आदर्श गाव असलेल्या पांगरखेड येथेच अवैध धंद्यांनी कळस गाठला आहे. या अवैध धंद्यांकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.याकडे आपण जातीने लक्ष देऊन आदर्श गावातील अवैध धंदे बंद करावे, अशी मागणी पांगरखेड ग्रामपंचायतीने ठराव घेत डोणगाव येथील पोलिस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदनाद्वारे केली आहे..

### पांगरखेड सारख्या अनेक गावांमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट पोलिसांचे दुर्लक्ष!

डोणगाव पोलिस स्टेशन अंतर्गत जवळपास ३२ खेडे जोडलेले असून या ३२ खेड्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अवैध धंदे आढळून येत असतात व नेहमीच या खेडेगावातून नागरिकांची सतत ओरड असते यामध्ये अवैध दारू अवैध गुटखा अवैध वरली मटका असे एक ना अनेक अवैध धंदे या गावांमध्ये खुलेआम चालू असतात मात्र स्थानिक बीड जमादार याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्यामुळे गावातील नागरिकांमध्ये पोलिसांविषयी प्रचंड रोष निर्माण होत आहे आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध व्यवसायांना चांगलाच जोमात चालू झालेला असून आता मात्र पोलीस प्रशासन याकडे कसं लक्ष देते व यावर कोणत्या प्रकारे नियंत्रण ठेवल्या जाते की पोलिसांकडून खुली सूट या अवैध धंद्या वाल्यांना दिले जाते. हे पाहणे तेवढेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# मालेगांव तालुक्यामध्ये नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी

## शिवाशक्ती नवदुर्गा उत्सव मंडपाचे पुजन

दैनिक आपला विदर्भ
■ प्रकाश भुरे

**मालेगाव :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शिवाशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळाच्या सदस्थानी मंडपाची पुजन करुण मंडपाला सुरवात केली सध्या हि मालेगाव व तालुक्यात अनेक सण उत्सव चालू झालेले आहे गणपती संपल्यानंतर मग आता सर्वत्र नवरात्रीचे धामधूम चालू झालेली आहे हिंदू कॅलेंडरनुसार आश्रिवन महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या प्रतिपदा तिथी पासून नवरात्री या सणाला सुरुवात होते त्यामुळे यावर्षी ही शारदीय नवरात्र गुरुवारी म्हणजेच ३ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु होणार आहे हिंदू धर्मानुसार नवरात्रीच्या या नऊ दिवसांमध्ये दुर्गा देवीच्या नऊ वेगवेगळ्या रूपांची पूजा केली जाते. यावेळी तिच्या जागर केला जातो हिंदू पुराणानुसार असे मानले जाते की नवरात्रीच्या या नऊ दिवसांमध्ये दुर्गामाता ही पृथ्वीवर निवास करत असते आणि तिच्या भक्तांचे रक्षण करत असते त्यामुळे नवरात्रीचे हे नऊ दिवस खूप




पवित्र असतात अनेक लोक या नऊ दिवसांमध्ये कडक उपवास करतात व पुजा अर्चना करतात व जवळच असलेले जंगदंबा देवी संस्थान नागरतास येथे लाखो भाविक भक्त दर्शनास येतात व तेथे ९ दिवस यात्रा हि भरते

### 'सारथी' च्या विभागीय कार्यालयासह २२५ कोटींच्या विविध इमारतींचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते भूमिपूजन

नाशिक, : नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) च्या १५६ कोटींच्या विभागीय कार्यालयासह विविध इमारती बांधण्यात येणार आहेत. या विभागीय कार्यालयासह अभ्यासिका, ५०० मुलांची व ५०० मुलींची वसतिगृह इमारत तसेच ४३ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या धनगर समाजातील १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थीनींसाठीचे वसतिगृह व कार्यालय इमारत आणि २५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या वनभवन इमारतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते कोनशिला अनावरण करून भूमिपूजन झाले.



# पाईपलाइनची अज्ञात इसमाकडून तोडफोड

## चतारी येथील घटना : पोलिसांकडून चौकशी सुरु

दैनिक आपला विदर्भ
■ नासीर शेख

**पातूर :** पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत चतारी येथे गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची अज्ञात व्यक्तीकडून तोडफोड केल्याचा धक्कादायक प्रकार शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजीच्या सकाळी उघडकीस आला आहे.

गेल्या काही महिन्यापासून जलजिवन मिशन योजनेच्या खोदकामामुळे गावातील पाणीपुरवठा बंद ठप्प झाला होता, पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी ग्राम पंचायतकडून शुक्रवारी दि.२७ सप्टेंबर रोजी अनेक ठिकाणी पाईपलाईनची दुरुस्ती केली, आणि शनिवारी सकाळी पाणीपुरवठा सुरू करताच अनेक ठिकाणी पाईपलाईनची तोडफोड केल्याचे उघडकीस आले, त्यामुळे ग्रामपंचायतने तत्काळ चान्नी पोलीस स्टेशन गाठून सदर घटनेबाबतची माहिती दिली, ठाणेदार रवींद्र लांडे यांनी बीट जमादारासह कर्मचाऱ्याना पाठवून चौकशीला सुरुवात केली आहे.यावर काय कारवाई होते याकडे चतारी वासियांचे लक्ष लागले आहे.

> पाणी पुरवठा ठप्प असल्याने शुक्रवारी पाईपलाईनची दुरुस्ती केली, आणि शनिवार रोजीच्या सकाळी पाणीपुरवठा सुरु केल्याने अज्ञात व्यक्तीने अनेक ठिकाणी पाईपलाईनची तोडफोड केल्याचे उघडकीस आले,राजकीय हेतूने मला बदनाम करण्याचा षडयंत्र आहे, याबाबतची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे.
>
> **-नवीता विनोद सदार**
> **सरपंच चतारी**

## युवराजसोबत डेट गेलेली ती अभिनेत्री कोण? ऑस्ट्रेलियात घातलेला गोंधळ, चाहत्यांनी शोधलं नाव

**मुंबई/प्रतिनिधी :** टीम इंडियाचा माजी ऑलराउंडर स्टार क्रिकेटपटू युवराजसिंग आता क्रिकेट खेळत नसला तरी नेहमी चर्चेत असतो. पूर्वी आपण एका अभिनेत्रीला डेट करत होतो असं युवराजने एका मुलाखतीत सांगितलं. युवराजने त्या अभिनेत्रीचं नाव अर्थातच सांगितलं नाही; पण ती कोण याबाबतच्या चर्चांना त्यानंतर उधाण आलं आहे. चाहत्यांच्या चर्चेतून आणि त्यांनी 'रेडिट'वर शेअर केलेल्या एका फोटोवरून ती कोण असावी याबाबतचे अंदाज व्यक्त करायला सुरुवात केली आहे.



एका पॉडकास्टमध्ये बोलताना युवराजसिंगने तो एका अभिनेत्रीला डेट करत होता हे सांगितलं. 'तिचं नाव सांगू शकत नाही; पण ती ॲडलेडमध्ये शूट करत होती. त्यानंतर माझ्याबरोबर ती कॅनबेरा इथे आली. तिथे आल्यानंतर म्हणाली, की तिला माझ्याबरोबर वेळ घालवायचा आहे; मात्र मी दौऱ्यावर होतो. त्यामुळे मला करिअरवर लक्ष केंद्रित करायचं आहे, हे मी तिला स्पष्ट सांगितलं,' असं युवराज या पॉडकास्टमध्ये बोलताना म्हणाला. एवढ्या माहितीवरून युवराजचे फॅन्स ती अभिनेत्री कोण असेल याबाबतचे अंदाज लढवताना दिसत आहेत. २००८मध्ये दीपिका पदुकोणचा 'बचना ए हसीनों' हा सिनेमा आला होता. त्याचे बरेचसे सीन हे सिडनीमध्ये शूट झाले होते. एका 'रेडिट' युझरने दीपिका आणि युवराज यांचा एक फोटोही शेअर केला असून त्यात दोघंही ऑस्ट्रेलियातल्या एका नाइट क्लबमध्ये दिसत आहेत.

# हिमाचल प्रदेशात बेकायदेशीर मशिदींविरोधात हिंदू समाज आक्रमक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिमला तसेच हिमाचल प्रदेशातील एकूण १२ जिल्ह्यांमध्ये मशिदींच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत हिंदू संघटनांनी निदर्शने केली. या निदर्शनात अनेक ठिकाणी सर्वसामान्य नागरिकही सहभागी झाले होते.

शिमल्यातील मशिदीच्या आत बेकायदेशीर बांधकामाचा मुद्दा पुन्हा एकदा जोर धरताना दिसत आहे. मशिदीतील बेकायदा बांधकामाचा मुद्दा शिमल्यापासून सुरू होऊन आता संपूर्ण हिमाचल प्रदेशात पसरत असल्याचे दिसत असून या मुद्द्यावरून शनिवारी पुन्हा एकदा हिंदू संघटनांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. मशिदींच्या बेकायदेशीर बांधकामाविरोधात शिमल्यासह




राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये आंदोलने झाली आहेत. या संपूर्ण प्रकरणाकडे राज्य सरकारचा दृष्टिकोन योग्य नसल्याचा आरोप हिमाचल देवभूमी संघर्ष समितीने केला आहे.

बेकायदेशीर मशीद प्रकरणी शिमला महापालिका आयुक्त न्यायालयात ५ ऑक्टोबर रोजी सुनावणी होणार आहे. देवभूमी संघर्ष समितीचे अध्यक्ष मदन ठाकूर यांनी निदर्शनाच्या माध्यमातून न्यायालयाकडे मशिदीबाबत लवकरात लवकर निर्णय देण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. याप्रकरणी ५ ऑक्टोबर रोजी निर्णय न घेतल्यास याप्रकरणी लोक रस्त्यावर उतरतील, असा इशारा संघर्ष समितीने यापूर्वीच दिला आहे. यापूर्वी ११ सप्टेंबर रोजी संजौली मशीद प्रकरणी हिंदू संघटनांनी शिमल्यात आक्रमक आंदोलन केले होते. यावेळी आंदोलकांवर लाठीचार्ज आणि पाण्याचा मारा तोफांचा वापर करण्यात आला. यानंतर राज्यातील बहुतांश शहरांमध्ये निदर्शने करण्यात आली. व्यापारी समुदायानेही २ ते ३ तास बाजार बंद ठेवून व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालय अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### नेरली येथे पाण्यातून गावकऱ्यांना विषबाधा; ६ रुग्णांची प्रकृती चिंताजनक



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड तालुक्यातील नेरली येथे काल रात्री गावातील काही नागरिकांना उलट्या, मळमळ व पोटात अचानक त्रास होत असल्याने गावातील अनेक नागरीकांनी शहरातील खाजगी रुग्णालया कडे धाव घेतली यात एका मागून एक नागरिक रूग्णालयात दाखल होत होते. यात दाखल झालेल्या ५० ते ६० रूग्णांवर उपचार सुरू करण्यात आले असून यातील ५ ते ६ रूग्णांची प्रकृती चिंताजनक आहेत. यातील २-३ रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ६ रुग्णांवर खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे त्याच्यावर उपचार करणारे डॉ. शाम दवणे यांनी सांगितले आहे.

### जनावरांच्या हाडांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर अंबड चौफुली परिसरात तालुका पोलीसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात पोलीसांनी आज सकाळी संशयितरित्या आढळून आलेल्या एका वाहनावर कारवाई करून वाहनासह दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदर वाहनामध्ये प्राण्याची हाडे रचून ठेवलेली तसेच वाहनामध्ये हाडाला लागलेले मास कुजून त्यात आळ्या पडलेले आढळून आले. वाहन चालक रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन धोकादायकरित्या वाहन चालवत कुजलेले जनावरांची हाडे मुंबईला घेऊन जात होता. यात तालुका जालना पोलीस ठाण्यात आरोपी मोहम्मद ताहा इमतियाज अन्सारी, दिलसार अक्तर अली हाश्मी दोन्ही आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

### नेरली येथील सर्व रुग्ण बरे होऊन घरी परत जातील- प्रताप पाटील चिखलीकर



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** काल रात्री पाण्याच्या माध्यमातून नेरली गावातील दोनशेहून अधिक लोकांना विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. त्या सर्व रुग्णांना शासकीय दवाखान्यांमध्ये दाखल करण्यात आले असून त्याची पाहणी माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली. यावेळी ते म्हणाले की हे जे घडलेला प्रकार आहे ते वाईट असून सर्व रुग्ण बरे होऊन घरी जातील असा मला विश्र्वास आहे. घडलेल्या प्रकाराची चौकशी देखील व्हावी कारण हे घडलेला प्रकार अत्यंत गंभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. काही रुग्णांची तब्येत ही अत्यंत बिकट असून त्यांची देखील ट्रीटमेंट चालू आहे असे माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर पत्रकारांशी बोलताना म्हणाले आहेत.

### १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार परीक्षा

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून १५ फेब्रुवारी २०२५ रोजी इयत्ता १०वी आणि १२वी बोर्ड परीक्षा २०२५ चे आयोजन केले जाईल. सीबीएसई ने २०२४ च्या बोर्ड परीक्षेच्या निकालाच्या घोषणेसोबत ही घोषणा केली होती.सीबीएसई बोर्ड परीक्षा २०२५ फेब्रुवारीपासून सुरू होऊन एप्रिलमध्ये संपण्याची शक्यता आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की डेटशीट आणि प्रवेशपत्र कधी प्रसिद्ध होईल.

सीबीएसई बोर्ड परीक्षा २०२४ चे डेटशीट CBSE cbse.gov.in च्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केले जाईल, जे विद्यार्थी डाउनलोड करू शकतील. मीडिया रिपोर्ट्सनुसार, १०वी आणि १२वी बोर्ड परीक्षा २०२५ चे वेळापत्रक १२ डिसेंबरपर्यंत जाहीर केले जाऊ शकते. मात्र, याबाबत बोर्डाकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. गेल्या वर्षीचा पॅटर्न पाहिल्यास प्रात्यक्षिक परीक्षांसाठी स्वतंत्र डेटशीट दिली जाईल. दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा केवळ शालेय स्तरावरच घेतल्या जातील. तर बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा बाह्य परीक्षकांच्या देखरेखीखाली होतील.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, सीबीएसई बोर्ड परीक्षा २०२५ १५ फ ेब्रुवारी ते ३ एप्रिल दरम्यान घेतली जाऊ शकते. तर बोर्डाच्या परीक्षेचे प्रवेशपत्र ७ फेब्रुवारीपर्यंत देता येतील. विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवावे की सीबीएसईने अद्याप कोणतेही अधिकृत डेटशीट जारी केलेले नाही.

# जिद्द अन् चिकाटीच्या बळावर संदीपची यशाला गवसनी

## अल्पभूधारक शेतकरी शेतमजूर बापाचा लेक भारतीय सैन्य दलात

दैनिक आपला विदर्भ

■ राम राहाणे

### आई वडिलांच्या कष्टाच चीज झाल

कौटुंबिक परिस्थिती जेमतेम असताना परिस्थितीला न डगमगता संदीपने आपल्या जिद्द व चिकाडीच्या बळावर सरकारी नोकरी मिळविली आहे. या यशामुळे गावामध्ये आनंदाच वातावरण निर्माण झाले असून संदीपच्या आईबाबाचेही सर्वत्र कौतुक होत आहे. तर ग्रामीण भागातील युवकांनी आपले ध्येय गाठण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी यश नक्कीच मिळते, त्यासाठी मेहनतीत सातत्य ठेवावे, असे आवाहन केले.

**डोणगावः** अल्पभूधारक कुटुंब असल्याने घरची आर्थिकस्थिती जेमतेम कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी बापाची होत असलेली ओढतानही परिस्थिती संदीपच्या मनाला चटका लावून गेली अन् संदीपने आपल्या जिद्द व चिकाटीच्या बळावर मॅकेनिकलचे काम करून राज्यस्तरीय कब्बडी व आता भारतीय सैन्यदलापर्यंत मजल मारली आहे.

संदीपची नुकतीच भारतीय सैन्यदलात निवड झाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे,तर संदीपच्या बाबाच्या कष्टाचे चिज झाले असल्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहेत.

डोणगावपासून जवळच असलेल्या शेलगाव येथील संदीपने १० वी पर्यंतचे शिक्षण गावातच घेतले व १० वीनंतर पुढील शिक्षणासाठी जवळ असलेल्या डोणगाव येथे प्रवेश घेतला, हे शिक्षण घेत असताना आपल्या शिक्षणाचा भार वडिलावर पडू नये, यासाठी मोटार सायकल गॅरेजवर काम काम केले. नंतर एका ऑटो पार्टच्या दुकानावर संदीप व त्याच्या मित्राने काम करून पुढील शिक्षण घेतले. पण तेथेही मन न रमेल्याने संदीपने ते काम सोडून शेतातील कामे करून १२ वी चे शिक्षण पूर्ण केले. १२ वीनंतर काय ? हा प्रश्न मनाला सतावत असताना बी.एस.सी.ला ऍडमिशन केली व पुन्हा गॅरेज लाईनमध्ये काम सुरू केले.

गावातीलच ओळखीच्या व्यक्तीच्या दुकानात तालुक्याच्या ठिकाणी मेहकर येथे पुन्हा गॅरेजवर कामाला प्रारंभ केला. पण तेथेही मन रमत नसल्याने व कबड्डी खेळण्याचे वेड असल्याने कबड्डी खेळातही संदीपने पारितोषिके मिळवली. ऑलिम्पिक असोसिएशन द्वारा आयोजीत राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत हरियाणा येथेही द्वितीय पारितोषिकाला गवसणी घातली.

पण यातही आपलं भागणार नसल्याने त्याने आर्मी व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या मुलांची मैत्री केली. त्यांच्यासोबत तो तयारीला लागला, कबड्डी व शेतीत कसलेल शरीर असल्यामुळे संदीपने अग्निवीरचे ग्राउंड १०० पैकी १०० गुण घेत सहज मारले तर याच काळात डोणगाव येथील जिजामाता स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र येथे भूषण बाजड यांच्याकडे



शिकवणी लावून पेपरही पास केला आणि इतर चाचण्याही पास करत दि. २३ सप्टेंबर रोजी अग्निविरमध्ये भरती झाला आहे.या यशाबद्दल संदीपवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### सिनेटमध्ये युवा सेनेचा विजय, आदित्यने तेजसला मारली मिठी

**मुंबई/प्रतिनिधी :** सिनेटच्या निवडणुकीवर उद्धव ठाकरे गटाचा पुन्हा एकदा वरचष्मा पाहायला मिळला आहे. सिनेटमधील भरघोष यशानंतर मातोश्रीवर जल्लोष पाहायला मिळालं आहे. ही तर विजयाची सुरुवात आहे. असाच विजय आपल्याला विधानसभा निवडणुकीतही मिळवायचा आहे. युवा सेनेनं १० जागा जिंकल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर मातोश्रीवर गुलाल उधळून कार्यकर्त्यांचा जल्लोष पाहायला मिळाला.या जल्लोषात तेजसही कार्यकर्त्यांसोबत डान्स करताना दिसला.

## तोतया पोलिसांनी १० लक्ष रुची केली फसवणूक सोन्याचे नाण्याचा सौदा युवकाला पडला महागात

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** सोन्याचा नाणी घेण्याचा सौदा एका युवकाला चांगलाच महागात पडला.काही तोतया पोलिसांनी चक्क पोलीस असल्याची बतावणी करत १० लक्ष रु ने फसवणूक केल्याची घटना दिनाक २५ २५/९/२०२४ रोजी साय ६ वाजताच्या दरम्यान आर्णी दिग्रस रोड वरील उड्डाण पुला खाली घडली आहे सदर घटनेची तक्रार आर्णी पोलिसात महेश रामेश्र्वर हाके वय २० वर्ष रा चाकुर ता लातुर या युवकाने दिली आहे हा युवक आरोपी दिनेश सुभाष पवार वय ४० या आरोपीने महेश यास माझ्या वडीलांची तब्यैत अचानक बिघडली असुन त्यांच्या उपचारा करीता मला पैशाची गरज असुन त्या बदल्यात मी तुला माझ्या वडीला जवळील खोदकामात सापडलेले सोन्याची नाणी देतो त्या बदल्यात मला १० लक्ष रुपये दे असे फिर्यादीस सांगितले तक्रारदाराला खात्री पटल्याने तक्रारदार १० लक्ष रू घेवुन आर्णी येथिल दिग्रस रोडवरील उड्डाणपुला जवळ आला व आरोपी याला पैसे आणल्याची खात्री झाल्याने फिर्यादी जवळची लाल रंगाची कापडी बॅग ज्यात १० लक्ष रुपये होते ती त्याला दिली व त्याच्या जवळची सोन्याची नाणी असलेली स्टिलची कॅटली घेतली यातील आरोपी गणेश याने बाजुला जावुन फोनवर कोणाला तरी संभाषण करुन दिलेली रक्कम हि बरोबर आहे की नाही म्हणून नोटा मोजु लागला त्याच वेळी अचानक पणे एक ग्रे कलरची महिद्रा चारचाकी वाहन घटणास्थळी दाखल झाले व त्या वाहनातुन अज्ञात पाच ईसम खाली उतरले त्यातील तीन व्यक्ती हे खाकी वर्दीच्या वेशात होते तर दोन व्यक्ती साध्या वेषात होते गाडीतुन उतरताच त्यांनी फिर्यादीच्या हातातील सोन्याच्या नाणी असलेली स्टिलची कॅटली व आरोपी यांच्या जवळील दहा लक्ष रुपये असलेली बॅग आपल्या कडे घेवुन लाथाबुक्याने त्याच्या हातातील लाठ्यानी मारहाण करुन तुम्ही येथुन लवकर निघा नाही तर सर्वाना अटक करतो अशी धमकी देऊन पोबारा केला त्यामुळे आरोपी दिनेश सुभाष पवार,गणेश गोपाळ चव्हाण, बापु नामक व्यक्ती व ईतर पाच असे नऊ आरोपींनी संगणमत करुन मला दहा लक्ष रुपयाचा गंडा घातल्याची तक्रार महेश रामेश्र्वर हाके याने आर्णी पोलीसात दिली असून आर्णी पोलिसांनी वरील सर्व आरोपी विरोधात कलम ३१८(४),२०५,३(५) भान्यास नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास आर्णी पोलीस करीत आहे.

### 'उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत', चंद्रहार पाटलांकडून १०१ पुजाऱ्यांच्या हस्ते महायज्ञ, बैलगाडा शर्यतीचाही थरार

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** कशिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील हे बैलगाडी शर्यतीच्या मैदानातच १०१ पुजाऱ्यांच्या हस्ते महायज्ञ करणार आहेत. अंबाबाई देवीची यात्रा आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त कवठेमहांकाळमध्ये रविवारी बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतीच्या मैदानातच महायज्ञ होणार असल्याचे याची आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होत आहे.

डबल महाराष्ट्र केसरी आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेचे राज्य संघटक चंद्रहार पाटील हे उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून उद्या बैलगाडी शर्यतीच्या मैदानातच १०१ पुजाऱ्यांच्या हस्ते महायज्ञ करणार आहेत. येत्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीची सत्ता येणार आहे. यामध्ये उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले पाहिजेत यासाठी या बैलगाडी शर्यतीच्या मैदानावरच १०१ पुजाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये महायज्ञ घेत असल्याचे चंद्रहार पाटील यांनी जाहीर केलेय.

याबाबत चंद्रहार पाटील म्हणाले की, २९ तारखेला या स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे चार लाख शेतकऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. या स्पर्धेला आम्ही मुख्यमंत्री केसरी असे नाव दिलेले आहे. महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेच्या मनात उद्धव ठाकरे हेच मुख्यमंत्री आहेत. जिथे आम्ही शर्यतीचे आयोजन करणार आहोत तिथेच आम्ही महायज्ञ करणार आहोत. उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत. येणाऱ्या काळात महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता येणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी आम्ही महायज्ञाचे आयोजन केले आहे.

## राज्यस्तरीय एरिअल स्पोर्ट्स स्पर्धा उत्साहात संपन्न

### एरियल स्पोर्ट्स असो.ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेचं एरियल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ नाशिक च्या सहआयोजक विश्व जिज्ञासा स्पोर्ट्स अकॅडमी व माउंट लिटरा स्कूल चा यशस्वी उपक्रम




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :**एरिअल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने एरिअल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ नाशिक द्वारा आयोजित (सहआयोजक- विश्र्वजिज्ञासा स्पोर्टस अकॅडमी व माउंट लिटरा झी स्कूल) २ री राज्यस्तरीय एरिअल स्पोर्ट्स स्पर्धा १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान उत्सहात झाली.

स्पर्धेच्या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक इस्कॉन मंदिन ट्रस्टचे संचालक व प्रचारक अद्भुतहरी प्रभूजी तसेच ज्येष्ठ क्रीडाशिक्षक व संघटक प्रदुम्न जोशी, बाळासाहेब रणशूर उपस्थित होते. तर राज्य संघटनेचे अध्यक्ष सतीश जाधव, उपाध्यक्ष डॉ. सुभाष डोंगरे, सचिव उमेश झोटिंग व जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष अजित बने, सचिव प्रशांत जोशी, संदीप पाटील हे उपस्थित होते.

मान्यवरांनी सर्व विजयी खेळाडूंचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या तर जे विजयी होऊ शकले नाही त्यांनी अधिक जोमाने प्रयत्न करून पुढील स्पर्धे त जिंकण्याचा संकल्प करण्यास सांगितला. उपरोक्त स्पर्धेत विवध दहा ते बारा जिल्ह्यातील २५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितिन जोशी व सौ. साळुंखे यांनी केले. स्पर्धेचे नियोजन तांत्रिक समिती अध्यक्ष अजिंक्य साळवी यांनी करून स्पर्धा संचालक म्हणून शांताराम पाटील यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी विष्वजिज्ञासा स्पोर्ट्स अकॅडमीचे सदस्य ह्रषीकेश गडाख, वेदांत मोरे, आदित्य गावंडे, अपूर्वा जाधव, रेणुका भावले, वेदांत शिंदे, वर्षा जोशी, शीतल बर्वे, ऐश्वर्या जोशी, सरोज पवार, डॉ. बैरागी, योगेश खैरे, गोविंद पितळे, नेहा सोनावणे, प्रियंका बिन्नर, अशोक सोनवणे, प्रेमानंद गोसावी, शीतल झोंबड, आकाश आंबेकर, अक्षिता जोशी, अश्र्विनी वाणी, सौ. साधंकर, सुरेंद्र वाघ, वेदांत सोनार यांनी परिश्रम घेतले.

## विधानसभा निहाय स्त्रीशक्ती संवाद मेळाव्याचे आयोजन

### शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या तथा प्रवक्त्या संजना घाडी यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने आज पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेला शिवसेना उपनेते प्रवक्त्या संजना घाडी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यातील कन्नड, वैजापूर व गंगापूर विधानसभा मतदारसंघाचा विधानसभा निहाय स्त्रीशक्ती संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



स्त्री शक्ती संवाद दौऱ्याच्या माध्यमातून नांदेड, हिंगोली जालना परभणी संभाजीनगर मध्ये दाखल झालो खूप चांगल्या प्रकारचे मेळावे या ठिकाणी झाले आहे.

या ठिकाणच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा झालं या ठिकाणच्या महिला आघाडीमध्ये चांगलं संघटन करणे समन्वय साधणे आणि विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षाने जे प्रलोभन महिलांपर्यंत आणून सोडलेली आहे ही कशी फसवी आहे याचा पर्दा फाश करण्यासाठी कोणते मुद्दे घेऊन लोकांपर्यंत जायचं या संदर्भात चर्चा त्या ठिकाणी होणार आहे. महिला सुरक्षितता याविषयी शक्ती कायदा पारित होण्याकरिता महिला आघाडी जिल्हा अधिकारी पोलीस यांना निवेदन देणार आहेत. महिला बेपत्ता , लैंगिक शोषण त्यांचे नीट दखल घेतलेली नाही पोलीस आयुक्त एस पी यांना निवेदन दिले जाणार आहे तसेच आशा वर्कर, अंगणवाडी सेविका ,मदतनीस आहे यांचे प्रश्न कसे ऐरणीवर आणून सोडवता येतील यावर सर्व या दौऱ्याच्या माध्यमातून चर्चा सुरू आहे.

गाव तिथे शाखा हा उपक्रम आम्ही घेतलेला आहे आणि ज्या ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी आम्ही सुरू केली आहे, सुरू करण्यापेक्षा ही महिलांना आम्ही सांगत आहे की ज्या ठिकाणी शाळा, महाविद्यालय, कॉलेजेस आहे त्या ठिकाणी महिला आघाडीने सुरक्षा विषयी काही चर्चा केली उपयोजना केलेली आहे का नाही त्या ठिकाणी चर्चा करून सीसीटीव्ही फुटेज कॅमेरे आहे की नाही किंवा त्या ठिकाणी असलेल्या महिलांना आम्ही काही सांगणार आहे तर त्या पद्धतीने काम करत आहे.

जसं निर्भया पथक उद्धव ठाकरे यांनी चालू केलं होतं तशाच मदती घेऊन त्या शाळेवर मुलींनी पुढे आलं पाहिजे महिला मुली त्यांच्यावर अत्याचार होतो त्यांनी पुढे यावे. महिलांची पक्षातील गटबाजी म्हणजे घरातील मुद्दे तुम्ही घरात कसं बघता तसंच आम्ही बघतोय थोडेसे मुद्दे म्हणजे काही वैचारिक मतभेद असतील तर हे वैचारिक मतभेद एकतर संवादाने सुटू शकतात किंवा ध्येय कुठला आहे हे कळल्यानंतर सुटू शकतात आपल्या ध्येय जर मोठे असेल तर छोटे छोटे वाद छोट्या छोट्या गोष्टी या तिथेच सोडून ते ध्येय गाठण्यासाठी एका संघपणे पुढे निघाला पाहिजे हा मेसेज या ठिकाणी आम्ही आमच्या महिला आघाडीला देणार आहे अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या तसेच प्रवक्त्या संजना घाडी यांनी दिली आहे.

# सरपंच शिवचरण आखाडे यांनी काढले महावितरणला फर्मान

- महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत सर्वसामान्यांतून तीव्र संताप
- दैनिक आपला विदर्भ वृत्ताची दखल : समस्या मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : महावितरणच्या भोंगळ कारभारासंदर्भात दैनिक आपला विदर्भाने दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांचा जीव धोक्यात या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित होताच.स्थानिक पदाधिकार्यांमध्ये महावितरण कंपनीबाबत तीव्र संताप व्यक्त करीत सदर समस्या तात्काळ मार्गी लावण्याची मागणी केली.या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास झालेल्या परिणास विद्युत वितरण कंपनी जबाबदार राहील असा इशाराही दिला आहे.







दैनिक आपला विदर्भमध्ये दि.२७ सप्टेंबर रोजी महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांचा जीव धोक्यात या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून नागरिकांच्या महावितरण कंपनीसंदर्भात असलेल्या समस्यांना वाचा फोडली होती.या वृत्ताची दखल घेत स्थानिक पदाधिकार्यांनी दैनिक आपला विदर्भमधील बातमीचा संदर्भ देत महावितरण कपंनीच्या अधिकार्यांविरोधात तीव्र रोष व्यक्त करून सदर समस्या निकाली काढण्याची मागणी केली. तर याअगोदरही दैनिक आपला विदर्भमध्ये सर्वसामान्यांचा समस्यांना वाचा फोडण्यासाठी वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताने झोपेचे सोंग घेतलेल्या कंपनीच्या अधिकार्यांनी खडबडून जागे होत समस्या निकाली काढून नागरिकांचा त्रास दूर केला होता. त्यामुळे दैनिक आपला विदर्भाचे नागरिकांकडून कौतुकही करण्यात आले. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे निर्माण झालेल्या समस्याबाबत दैनिक आपला विदर्भमध्ये वृत्त प्रकाशित करून संबंधीत विभागाचे लक्ष वेधून कामकाजावर ताशेरे ओढले होते. या वृत्ताची डोणगावचे सरपंच शिवचरण आखाडे व स्थानिक पदाधिकार्यांनी दखल घेत डोणगाव हद्दीतील महावितरणच्या समस्या तात्काळ निकाली काढण्याची मागणी महावितरण कंपनीकडे निवेदनाद्वारे केली आहे.तसेच सदर समस्या तात्काळ निकाली न काढल्यास झालेल्या परिणामाला विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील असा इशाराही दिला आहे.

## नादुरुस्त रोहित्र दुरुस्त करा : सरपंच शिवचरण आखाडे



महावितरणला काढले फर्मान डोणगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनेक रोहित नादुरुस्त आहेत. परिणामी नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, तसेच अनेक रोहित्र हे जमिनीला टेकलेले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवितवाला धोका निर्माण झाला आहे. रोहित्रा भोवताल पावसाचे पाणी साचलेले असल्याने जीवित हानीचा धोका निर्माण झाला आहे. त्याचबरोबर विद्युत ताराही जमिनीवर लोंबकाळलेल्या आहेत. अनेक ठिकाणी फ्यूज डायरेक्ट जोडलेले आहेत. फ्युजपेटी पूर्णपणे उघड्या आहेत. या उघड्या फ्युज पेटीमध्ये पाण्यामुळे वारंवार बिघाड होत आहे. तसेच अनेक ठिकाणी रोहित्र हे डबक्यामध्ये पावसामुळे साचलेल्या पाण्याला टेकलेले असल्यामुळे पाण्यात विद्युत प्रवाहन उतरून जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे डोणगाव हद्दीतील नादुरुस्त रोहित्र तात्काळ दुरुस्ती करावी, तसेच ग्राहकांना होणारा त्रास दूर करावा, नागरिकांना सुरक्षित वीज पुरवठा करण्यासंदर्भात उपाययोजना कराव्या, अशा याचे डोणगाव येथील सरपंच शिवचरण आखाडे यांनी डोणगाव येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकार्‍यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

## विविध वृत्त...

### अल्पसंख्यांक शाळेमध्ये पदभारतीचा मार्ग मोकळा

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : अल्पसंख्यांक शाळांमधील मंजूर शिक्षकांच्या पदांपैकी ८० टक्के पदभरती ला शासनाने मान्यता दिल्यामुळे एकूण पदांपैकी ८० टक्के पद भरती चा मार्ग मोकळा झाला आहे .याबाबत दि.२६ सप्टेंबर रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने पत्र निर्गमित केले आहे या संदर्भात शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी सतत पाठपुरावा केला होता. दिनांक २ फेब्र २०२३ च्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्यांक शाळांमधील शिक्षकीय मंजूर पदांच्या ५०% पदे भरण्याची मान्यता दिल्या गेलेली होती. मात्र २१/६/ २०२३ च्या शासन निर्णयानुसार सामान्य शाळांमधील मंजूर शिक्षक पदाच्या ८०% पदे भरण्यासाठी मंजुरी दिली गेली होती. त्यामुळे अल्पसंख्याक शाळा व सामान्य शाळा यामध्ये पद भरती बाबत तफावत वाटत असल्याने हा भेद असू नये. यासाठी किरणराव सरनाईक यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती की, अल्पसंख्यांक शाळांमध्ये सुद्धा ८० टक्के पद भरती ची परवानगी देण्यात यावी. या मागणीला यश आले असून दिनांक २६ सप्टेंबर रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने पत्र निर्गमित करून अल्पसंख्यांक शाळांमधील मंजूर शिक्षकीय पदांपैकी ८०% पदभरतीची परवानगी देण्यात आलेली आहे.

आगामी विधानसभा निवडणूक आचारसंहिता अमलात येण्यापूर्वी विभागातील सर्व जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शाळेतील पद मान्यतेचे प्रलंबित प्रस्ताव निकाली निघणे सुद्धा आवश्यक आहे. त्यामुळे आमदू किरणराव सरनाईक यांनी पटवे शिक्षण उपसंचालक अमरावती यांना फोनवरून संवाद साधून तसेच निवेदनाद्वारे सर्व शिक्षणाधिकारी यांना प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याचे आदेश देण्याची विनंती केली होती. त्यावर पटवे यांनी सुद्धा पत्र निर्गमित केले असल्याची माहिती आमदार सरनाईक यांच्या स्विय सहायकाने दिली आहे.

### घोटा येथील बैल जोडी चोरी शेतकऱ्याची दीड लाख रुपयाचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** :येथुन जवळच असलेल्या घोटा येथील रामेश्वर ज्ञानबा मोरे यांची बैल जोडी चोरीला गेल्याची घटना काल दिनांक २७ सप्टेंबर च्या रात्री घडली.



मागील काही दिवसापासून ग्रामीण भागात स्पिंकलर तोट्या शेती साहित्यासह भुरट्या चोऱ्या व गुरांच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे काल दिनांक २७ सप्टेंबर च्या रात्री घोटा येथील शेतकरी रामेश्वर ज्ञानबा मोरे यांची बैल जोडी चोरी गेली असून सदर बैलजोडीची किंमत दीड लाख रुपये असल्याचे रामेश्वर मोरे यांनी सांगितले आहे याप्रकरणी रिसोड पोलिसात रिपोर्ट देण्यात आला आहे तालुक्यातील शेतकरी आधीच अस्मानी संकटात सापडला आहे येन हंगामात बैल जोडी चोरीला गेल्यामुळे मोरे यांचे दीड लाख रुपयाची नुकसान झाले आहे ग्रामीण भागात गुरांच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून एकदा चोरीला गेलेली गुरे पुन्हा सापडत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द ठेवून ध्येय गाठावे : दिपक कुटे

### बेलगाव येथे एनएमएमएस परीक्षेबद्दल मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : शिक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये जिद्द असणे आवश्यक आहे. शिक्षण पूर्ण करण्यासाठी शासनच्या विविध योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून सहज शिक्षण पूर्ण करून आपले ध्येय गाठता येते. विद्यार्थ्यांनी फक्त शिक्षणाची जिद्द ठेवून ध्येय गाठावे, असे आवाहन प्रमुख मार्गदर्शक शिक्षक कोपाडे यांनी केले. ते बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित दि.२८ सप्टेंबर रोजी एनएमएमएस परीक्षेबद्दल मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे



मुख्याध्यापक दीपक कुटे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय डोणगाव येथील तज्ञ शिक्षक कोडापे व वारकरी यांची उपस्थिती होती. यामध्ये कोडापे यांनी विद्यार्थ्यांना कशाप्रकारे विषयाची तयारी करून परीक्षेला सामोरे जायचे याबद्दल माहिती दिली. तर वारकरी यांनी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती तसेच परीक्षेमध्ये भविष्यात होत असलेले फायदे सांगून अभ्यास कशा पद्धतीने करायचा याबाबत मार्गदर्शन विद्यार्थी व पालकांना केले. यामध्ये पालक सुधीर वानखेडे विकास वानखेडे, संजाबराव देशमुख, संजय साबळे, विकास जाधव यांच्यासह बहुसंख्य पालक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन वर्ग ८ चे वर्गशिक्षक एच.एल. वानखेडे यांच्यावतीने करण्यात आले होते. शिक्षक विनोद मंटांगळे यांनी या कार्यक्रमाचे संचालन करून आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक कावरखे, वानखेडे,गीते, मेटांगळे, रहाटे, बागुल, साखरे, शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे गजानन देशमुख यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

## दिग्रस मध्ये काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा; अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित



दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**दिग्रस** : दिनांक २८ सप्टेंबर रोजी दिग्रस मध्ये कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला या कार्यक्रमात अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमात माजी मंत्री माणिकराव ठाकरे,व माजी मंत्री शिवाजीराव मोघे, पी.बी आडे, व अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते त्या कार्यकर्ते मेळाव्यात संभाव्य उमेदवार हे राहुल माणिकराव ठाकरे असतील असे जफर खान यांनी सांगितले. राहुल ठाकरे यांनी मंत्री संजय राठोड यांना विकास पुरुष नव्हे तर विनाश पुरुष असल्याचे सांगितले. प्रत्येक कामात कमिशन खोरी असल्याचे देखील त्यांनी सांगितले. देवाधर्माच्या कामात सुद्धा कमिशन घेण्याचे सांगितले. कमिशन अभावी, दारव्हा ते दिग्रस मार्गाचा कंत्राटदार पळून गेल्याचे देखील त्यांनी सांगितले. त्या अनुषंगाने पत्रकारांना बोलवून माणिकराव ठाकरे यांनी विचारविनिमय केले व सांगितले की महाविकास आघाडी एकजूटपणे लढणार व महाविकास आघाडीचा विजय होणार उमेदवार सध्या निश्रि्चत झालेला नाही. महाविकास आघाडीमध्ये उमेदवार निश्रि्चत करण्यासाठी महाविकास आघाडीमध्ये अंतर्गत चर्चा सुरू असल्याचे देखील त्यांनी सांगितले महाविकास आघाडी एकत्रित निर्णय घेऊन लवकरच दमदार आव्हान देणाऱ्यालाच महाविकास आघाडी उमेदवारी देणार.

## मुंबईकरांचा पाणी प्रश्न सुटला! पाणीपुरवठा करणारी धरणे काठोकाठ भरली

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाने चांगलाच जोर धरला होता. त्यानंतर आता परतीच्या पावसानेही धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी असणारे धरणे,नदी-नाले तुडुंब भरले गेले आहेत. तसेच मुंबई शहराला पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या सर्व धरणे देखील काठोकाठ भरले आहेत. त्यामुळे मुंबईकरांवरील पाणी प्रश्न सुटणार आहे.

मुंबई महानगर पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमधील पाणीसाठा १०० टक्क्यांजवळ पोहचला आहे. आज सकाळी ६ वाजता या जलाशयांमधील पाणीसाठा १४,३९,२७१ दशलक्ष लिटर इतका झाला. म्हणजेच एकूण ९९.४४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे मुंबईकरांचा वर्षभरासाठीचा पाणीप्रश्न मिटला आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात कुत्रा ठार

### खंडाळा येथील येथील घटना : शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण


दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : बिबट्याच्या हल्ल्यात कुत्रा ठार झाल्याची घटनपा लोणार तालुक्यातील खंडाळा येथे दि.२७ सप्टेंबर रोजी रात्री दरम्यान घडली. या घटनेमुळे मात्र शेतकर्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याकडे वनविभागाने लक्ष देऊन शेतकर्यांमध्ये निर्माण झालेली भिती दूर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. लोणार तालुक्यातील खंडाळा येथील ज्ञानदेव सखाराम दराडे यांच्या गट नंबर २३० व २३२ मध्ये कपाशी पिकाची लागवड केलेली आहे. त्या कपाशी पिकाचे वन्य प्राण्यांपासून रक्षण करण्यासाठी दराडे यांनी कुत्रा पाळला होता. दि. २७ सप्टेंबरच्या रात्री कुत्रा शेतात असतांना बिबट्याने कुत्र्यावर हल्ला केला. या हल्यात कुत्रा जागीच ठार झाला.

सकाळी शेत मालक ज्ञानदेव दराडे शेताला चक्कर मारण्यासाठी गेले असता त्यांना कुत्रा मृत अवस्थेत पडलेला दिसून आला. आजुबाजुला पाहिले असता कुत्रा व बिबट्यामध्ये झटापट होऊन जमिनीवर जागोजागी रक्त व मांस पडलेले दिसले. दोन दिवसांपासून पाऊस पडत होता. त्यामुळे चिखलात बिबट्याच्या पायाचे ठसे शेत मालकाला दिसले. त्यांनतर दराडे यांनी ही माहिती गावातील नागरिकांना दिली. गावातील युवकांनी वन







विभागाला या घटनेबाबत माहिती दिली असता वनरक्षक आरो यांनी घटनास्थळी येऊन पाहिले असता बिबट्याच्या पायाचे ठसे त्या ठिकाणी दिसले.

पंचनामा करून वरिष्ठांना कळविल्याचे वनरक्षकांनी सांगितले. एक महिन्या अगोदर याच शिवारात बकरीवर बिबट्याने हल्ला करुन जखमी केले होते. आता कुत्र्यावर हल्ला करून ठार केले आहे. त्यामुळे शेतकर्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून या बिबट्याने एखाद्या व्यक्तीवर हल्ला केला तर याला जबाबदार कोण असा असा प्रश्र्न खंडाळा येथील नागरिकांनी उपस्थित केला आहे. तसेच या बिबट्याचा शोध घेऊन याला तात्काळ जेरबंद करून दुसर्या ठिकाणी हलवावे, अशी मागणी बिबी, खंडाळा, किनगाव, चिखला येथील शेतकर्यांनी केली आहे.